नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०२/२०२६ (शनिवार)

---

## भारताच्या 'IndiaAI Impact Summit' मध्ये मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी जटिल आर्थिक गुन्ह्यांच्या तपासासाठी 'Agentic AI'चा वापर या विषयावर प्रभावी सादरीकरण केले

दिनांक २०/०२/२०२६ रोजी नवी दिल्ली येथे भारत मंडपम् मध्ये आयोजित 'IndiaAI Impact Summit' या जागतिक परिषदेचा समारोप कार्यक्रम पार पडला.

समारोपी दिनी वित्त मंत्रालयाच्या आयकर विभागातर्फे **"जटिल आर्थिक गुन्ह्यांमध्ये 'Agentic AI' चा वापर"** या विषयावर मा. अध्यक्ष, केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ, Central Board of Direct Taxes यांच्या अध्यक्षेखाली विशेष सत्र आयोजीत करण्यात आले होते. सदर सत्रामध्ये मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, मार्वेल, **MARVEL ( Maharashtra Advanced Research and Vigilance for Enhanced Law Enforcement )** यांनी सदर विषयावर प्रभावी सादरीकरण केले. मा. श्री हर्ष पोद्दार यांनी डिसेंबर २०२५ मध्ये मा. ना. श्री. देवेंद्र फडवणीस ,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मायक्रोसॉफ्टचे सीईओ श्री. सत्या नडेला यांच्या हस्ते लोकार्पित झालेले गुन्हे तपासासाठी विकसित करण्यात आलेले कृत्रिम बुध्दीमत्ता

तंत्रज्ञान **”MahaCrimeOS“** या अत्याधुनिक तपास सहाय्यक (**Investigation Copilot**) प्रणालीची सविस्तर माहिती दिली.

आर्थिक फसवणूक, अमली पदार्थ तस्करी, महिलांविरुद्धचे गुन्हे तसेच सायबर गुन्हे यांसारख्या जटिल स्वरूपाच्या प्रकरणांच्या तपासामध्ये MahaCrimeOS या AI तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरांबाबत माहीती दिली. या विशेष सत्राला आयकर विभाग व वित्त मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. **विशेष सत्राला उपस्थित अधिकाऱी यांनी** या तंत्रज्ञानाच्या उपयुक्तेचे विशेष कौतुक केले **MARVEL** संदर्भातील **‘IndiaAI Impact Summit’** मधील हे दुसरे सादरीकरण होते. यापुर्वी दिनांक १६/०२/२०२६ रोजी भारत सरकारच्या **Ministry of Home Affairs** (गृह मंत्रालय) यांच्या वतीने “पोलिस दलामध्ये **AI** चा वापर” मध्ये ‘ **sovereign AI** ’ या विषयावर मा.श्री हर्ष ए पोद्दार यांनी प्रभावी सादरीकरण केले होते.


AI
IMPACT
SUMMIT
WELFARE FOR ALL | HAPPINESS OF ALL

# नागपुर ग्रामीण पोलसांनी ऑपरेशन मुस्कान या शोध मोहीमे अंतर्गत हरवलेल्या/पळविलेल्या, (अपहरण, अपनयन) झालेल्या एकुण १२ बालकांचा घेतला शोध

मा. अपर पोलीस महासंचालक, महीला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, मध्हाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाने दिनांक २०/०१/२०२६ ते २०/०२/२०२६ या कालावधीत संपुर्ण राज्यात हरवलेल्या/ पळविलेल्या ( अपहरण, अपनयन ) बालकांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान शोध मोहीम राबवण्यात आली. या मोहीमे अंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हा येथे हरविलेल्या/ पळविलेल्या प्रकरणांमधील बालकांचा शोध घेण्याकरीता विविध शोध पथके नेमुन यशस्वीरित्या मोहीम पार पाडण्यात आली. मा.श्री हर्ष ए. पोद्‌दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, जिल्हा यांच्या मार्गदर्शनात या मोहिमेचे नेतृत्व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी केले असुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभाग, नागपुर ग्रामीण चे प्रमुख, पोलीस निरीक्षक श्री मिलींद तायडे यांचे पथकांसह तसेच प्रत्येक पोलीस स्टेशन ला १ असे एकुण २१ मिसींग शोध पथक स्थापन करण्यात आले. स्थापन केलेल्या विविध पथकांनी तांत्रिक पुरावे तसेच गुप्तबातमीदार यांच्या मदतीने हरविलेल्या/पळविलेल्या अल्पवयीन बालकांचा कसुन शोध घेतला. **“ ऑपरेशन मुस्कान शोध मोहीम ”** अंतर्गत दिनांक २०/०१/२०२६ ते २०/०१/२०२६ रोजी पर्यंत सन २०२१ पासुन हरविलेल्या/पळविलेल्या १२ अल्पवयींन बालकांचा शोध घेण्यात आला आहे.अशा प्रकाराची अल्पवयीन बालकांबाबतच्या प्रत्येक तक्रारीची नागपूर ग्रामीण पोलीस गंभीर दखल घेतात आणि मदतीस तत्पर असतात.

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
# २० गोवंश जनावरांची सुटका,
# स्थानिक गुन्हे शाखा आणि मौदा पोलीसांची संयुक्त कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा:— दिनांक २०/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन मौदा परीसरात अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशिर माहीती दिली की, **प्रकाश बोरकर रा.(खराडा पुनर्वसन ) मारोडी, मौदा. याने आयशर वाहनात कत्तलीकामी गोवंश जनावरे भरली असुन ते वाहन मौदा मार्गे नागपुर च्या दिशेने निघाले आहे.** अशी माहीती मिळताच पोलीसांनी मौजा मारोडी पुलाजवळ नाकाबंदी केली असता एक संशयीत आयशर वाहन त्यांच्या दिशेने येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबण्याचा इशारा केला असता पोलीसांना पाहुन सदर वाहन चालकाने त्याचे वाहन न थांबवता मथनी टोल नाक्याकडे पळविले. पोलीसांनी वाहनाचा पाठलाग केला असता वाहन चालकाने भरधाव वेगाने वाहन चालविल्याने गुमथळा पुलाकडुनल कामठी कडे वळवित असतांना वाहन पलटी झाले. त्यानंतर वाहन चालक वाहन सोडुन पळुन गेला.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर माहीती श्री संतोष गायकवाड, उविभागिय पोलीस अधिकारी यांना देवुन मौदा पोलीसांना घटनास्थळी बोलाविले. पोलीसांनी पंचासमक्ष आयशर ट्रक क्रमांक एम एच ४० /सीडी ३४६९ या वाहनाची तपासणी केली असता यामध्ये २० गोवंश जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, निर्दयतेने शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून आयशर ट्रक क्रमांक एम एच ४० /सीडी ३४६९ किंमती १५,००,०००/— रूपये आणि २० गोवंश जनावरे किंमती २,००,०००/— रूपये असा एकुण किंमती १७,००,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या २० गोवंश जनावरांना गोविज्ञान अनुसंधान गोशाळा खरबी ता.जि भंडारा येथे दाखल करण्यात आले आहे.

नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन मोदा येथे आरोपी प्रकाश बोरकर रा.(खराडा पुनर्वसन ) मारोडी, मौदा आणि आयशर ट्रक क्रमांक एम एच ४० /सीडी ३४६९ च्या चालका विरूध्द कलम ११(१)(अ)(ड)(फ) प्रा. छ. प्र. अधी., ५(१)(२),९ प्रा. सरक्षण अधी., सहकलम २८१,भान्यासं. सहकलम १८४ म पो का, सहकलम २३९,१७७ मो वा का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा
## रेती आणि वाहन असा ४५ लाख,५० हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक २०/०२/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कन्हान उपविभागात पोलीस स्टेशन मौदा परीसरात अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने माहीती खात्रीशिर माहीती दिली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नागपुर ते भंडारा महामार्गावरील उमरी फाटा येथे नाकाबंदी केली असता एक संशयीत १२

चक्का ट्रक क्रमांक एम एच ४० डी १८४५ हे वाहन मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **विकी शिवशंकर ठवकर,३५ वर्ष,रा.चांदोरी ता. जि. भंडारा हा मिळुन आला. आरोपींना** परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **वाहन मालक आरोपी नामे निहाल बालगोपाल दुरुगकर, रा. शहापूर, ता. जि. भंडारा** याच्या सांगण्यावरून रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याबाबत माहीती पोलीसांना दिली. **पोलीसांनी पंचासमक्ष १) १२ चक्का ट्रक क्रमांक एम एच ४० डी १८४५ किंमती** ४५,००,०००/— रूपये आणि २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण ४५,५०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी वाहन चालक आणि मालक आरोपीतांविरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२),४९,३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम ,कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम, कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, रामटेक यांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवणी :— दिनांक २०/०२/२०२६ रोजी श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, कार्यालय, रामटेक यांच्या आदेशाने उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय येथील पोलीस पथक रामटेक उपविभागात पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत काळाफाटा शिवारातील पेंच नदीतचे पत्रातुन अवैधरित्या विनापरवाना रेतीचे उत्खनन करून चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी काळाफाटा ते नयाकुंड रोडवर नाकाबंदी केली असता एक संशयीत लाल रंगाचे MAHINDRA 585 DI SARPANCH

कंपनीचे विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर ट्रॉलीसह मिळुन आले. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **अश्विन तुकारामजी बोंद्रेबावने, वय २३ वर्षे, रा माहुली ता पारशिवणी हा मिळुन आला. आरोपींला** परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **वाहन मालक आरोपी नामे राहुल कुसुंबे, रा माहुली** याच्या सांगण्यावरून रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याबाबत माहीती पोलीसांना दिली. **पोलीसांनी पंचासमक्ष १) लाल रंगाचे MAHINDRA 585 DI SARPANCH** कंपनीचे विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर ट्रॉलीसह किंमती ६,००,००० /— रूपयांची आणि २) १ ब्रास रेती किंमती ६०००/— रूपये असा एकुण ६,०६,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२),४९,३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २१/०२/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार

गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७३३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२आरोपी अशा एकुण ९९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३२ आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग** :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण ११९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३२ आरोपी अशा एकुण ६५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग** :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २९ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग** :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १८६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७३३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने